Maharashtra Mandal mmla Los Angeles

नमस्कार मंडळी,

२००८ चे वर्ष संपल्यात जमा आहे. आम्ही गेले वर्षभर अनेक दर्जेदार कार्यक्रम आपल्यापुढे सादर केले आणि काही महत्वाचे निर्णय घेतले. या सर्वांचा आढावा पुढील मजकुरात घेत आहोत.

वर्षाची सुरुवात संक्रांतीच्या कार्यक्रमाने झाली. लहान मुलांच्या MMLA आयडॉल स्पर्धेमधील गुणवत्ता पाहून अनेकांनी तोंडात बोटे घातली. संगीताच्या क्षेत्रातील नवीन मराठी पिढीतील ताऱ्यांना आपल्यापुढे आणण्याचा हेतु या स्पर्धेने साध्य झाला.

मार्चमध्ये गजरा हा बहारदार कार्यक्रम आम्ही आपल्यापुढे आणला. त्यागराज खाडीलकर यांच्या सुरेल गळयाने संपूर्ण अमेरीकेची मने जिंकली. मे मध्ये सुयोगने अमेरीकेत आणलेली कबड्डी कबड्डी आणि लव्ह स्टोरी ही दोन दर्जेदार नाटके आम्ही सादर केली. या नाटकांना आपण भरघोस प्रतिसाद दिलात. गेल्या अनेक वर्षात अमेरीकेत आलेल्या व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांमध्ये ही दोन नाटके सर्वोत्तम मानली जातात. उन्हाळयामध्ये शिरीष कणेकरांची कणेकरी, सिमी व्हॅलीतील रसिकांसाठी कॅामन मॅन आणि मोहन आगाशे यांचे नाट्यवाचन असे अनेक दर्जेदार कार्यक्रम आम्ही आपल्यापुढे मांडले.

ह्या वर्षीचा गणेशोत्सवाचा कार्यक्रम सर्वांनाच आवडला. स्थानिक कलाकारांनी गणेशोत्सवात सादर केलेले कार्यक्रमही दर्जेदार होते. आपण दिलेल्या प्रतिक्रियांनी आमच्या मेहनतीचे चीज झाले. आम्ही केलेल्या देणगीच्या आवाहनाला आपण अतिशय उत्तम प्रतिसाद दिलात. आपण दिलेल्या देणग्यांमुळे गणेशोत्सवावर मंडळाने केलेला सर्व खर्च भरुन निघाला. दिवाळीला यंदा आम्ही वेगळा कार्यक्रम करण्याचा प्रयोग केला. आपल्याला नवनवीन कार्यक्रम देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो हे आपल्याला यावरुन कळेलच.

केवळ दर्जेदार कार्यक्रम देण्यापुरते मर्यादीत न राहता आम्ही या वर्षी काही विशेष पाऊले उचलली. त्यातील एक महत्वपूर्ण पाऊल म्हणजे विश्वस्त समितीची नेमणूक. जूलैमध्ये आम्ही अजय दांडेकर, आशिष महाबळ, श्रीनिवास माटे, मिलिंद जोशी, चंद्रशेखर साठे यांची महाराष्ट्र मंडळाचे विश्वस्त म्हणून नेमणूक केली. विश्वस्त समिती महाराष्ट्र मंडळाचे दिर्घ मुदतीचे नियोजन करेल आणि मंडळासाठी धोरण बनवेल.

दुसरे महत्वाचे पाऊल म्हणजे अनेक वर्षांनी प्रथमच महाराष्ट्र मंडळाने सिमी व्हॅलीत कार्यक्रम आयोजित केले. सिमी व्हॅलीतील मराठी बांधव मंडळाच्या कार्यक्रमांना अंतरामुळे येऊ शकत नव्हते. त्यांच्यापर्यंत पोचण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला. व्हॅलीतील लोकांनाही त्यांला भरघोस प्रतिसाद दिला.

२००९ सालासाठी नविन समितीने सुत्रे हातात घेतली आहेत. वैभव पावले, अंजली डमेरला, श्रीपाद रेगे, वीणा प्रभू पुढील वर्षीही समितीवर काम करतील. मिलन भोसेकर, अतुल देशपांडे, अमित गवते, जान्हवी गुप्ते, कार्तिक गुप्ते, कुणाल कुळकर्णी, प्राजक्ता कुळकर्णी, अनिरूद्ध महिषी आणि विशाल विभांडीक यांची २००९/१० साठी समितीवर निवड झाली आहे. कार्तिक गुप्ते यांनी अध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतली आहेत. लोकांचे मत आजमावण्याकरता नविन समितीने महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर (http://mmla.org) एक सर्व्हे ठेवला आहे. आपण संकेतस्थळावर जाऊन तो पूर्ण करावा ही विनंती. आपण जसा २००८ च्या समितीवर सहकार्याचा वर्षाव केलात तसाच आपण २००९ च्या समितीवरही करावा हिच आमची नम्र विनंती.

आपले नम्र,
सौरभ अलूरकर, निवृत्ती बऱ्हाटे, अंजली डमेरला, आशुतोष खुंटे, वैभव पावले, वीणा प्रभू, वैभव पुराणिक, अनुजा रत्नपारखी, श्रीपाद रेगे
(२००८ महाराष्ट्र मंडळ समिती)